नवराष्ट्र

## प्राचार्य डॉ.भरत शिंदे यांनी करारावर केली स्वाक्षरी

# विद्या प्रतिष्ठान फाउंडेशनमध्ये करार

बारामती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विद्या प्रतिष्ठान कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि क्विकहील फाउंडेशन यांच्यामध्ये ₹कमवा आणि शिकार योजनेसाठी सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भरत शिंदे यांनी स्वाक्षरी केली तर क्विकहील फाउंडेशनच्या सीएसआर समितीने स्वाक्षरी केली. या सामंजस्य करारातुन विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य आणि व्यावहारिक अनुभव प्रदान होईल. शिक्षक आणि समन्वयकांसाठी प्रशिक्षण सत्रे आणि तांत्रिक मार्गदर्शन वाढवतील. या उपक्रमाचा उद्देश शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे ज्ञान देणे आणि सामाजिक साक्षर करणे आहे. दोन्ही संस्था या योजनेच्या यशस्वीतेची खात्री करण्यासाठी वचनबद्ध आहेत. क्विकहील फाउंडेशन प्रगत सायबर सुरक्षा उपायांसाठी ओळखले जाते.




## विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणार

- फाउंडेशन ची सीएसआर शाखा सामाजिक सायबर सुरक्षा करण्यावर लक्ष केंद्रित करते.
- ₹कमवा आणि शिकार हि योजना विद्यार्थ्यांना उद्योग-विशिष्ट कौशल्ये सुसज्ज करण्यासाठी उपयुक्त ठरेल.
- दोन्ही संस्था या योजनेचे सकारात्मक परिणाम पाहण्यास उत्सुक आहेत.
- करारासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ.श्यामराव घाडगे ,उपप्राचार्य डॉ.लालासाहेब काशीद, गजानन जोशी, किशोर ढाणे विभाग प्रमुख महेश पवार यांचे मार्गदर्शन लाभले.
- उपक्रमाच्या समन्वयक सलमा शेख तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून साहिल तावरे काम करणार आहे.
- करार यशस्वी होण्यासाठी गौतम कुदळे, विशाल शिंदे, अनिल काळोखे, पुनम गुंजवटे, अक्षय भोसले अक्षय शिंदे, वैशाली पेंढारकर कांचन खीरे रवी जुन्नरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.